
Asia 120 Years citi
Enabling progress in Asia for 120 Years

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय
C S M V S

100 YEARS



# CENTENARY EXHIBITION

## 100 YEARS

## CSMVS
Mumbai

'If you cannot come to the museum, the museum will come to you'

## MUSEUM ON WHEELS

A Citi - CSMVS Outreach Initiative


# प्रदर्शनाबद्दल

10 जानेवारी 1922 रोजी संग्रहालय लोकांसाठी खुले झाले आणि देशभरातील किंबहुना जगभरातील लोक येथील कलाकृतींशी जोडले गेले. हे प्रदर्शन म्हणजे संग्रहालयाच्या 100 वर्षांच्या प्रवासाचा उत्सव आहे आणि “म्युझियम ऑन व्हील्स” हा संग्रहालयाचा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठीचा उपक्रम आहे. हे प्रदर्शन संग्रहालयाच्या विकासातील प्रमुख टप्पे टिपत त्याच्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण संग्रहाची ओळख करून देत आहे.

खाली संग्रहालयातील काही महत्त्वाच्या वस्तूंचे वर्णन दिले आहे. ते वाचून तुम्ही त्या नेमक्या कुठे पाहिल्या असतील हे आठवण्याचा प्रयत्न करा!

## संग्रहालयाबद्दल

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, हे देशातील प्रमुख संग्रहालयांपैकी एक आहे. मुंबईच्या दक्षिण टोकाला 'क्रिसेंट साइट' म्हणजेच चंद्रकोरीच्या आकारच्या जमिनीवर वसलेली संग्रहालयाची ही इमारत इंडो-सारासेनिक वास्तुशैलीचे उत्तम उदाहरण आहे. हिंदू, इस्लामी आणि पाश्चात्य वास्तुकलेचा संगम येथे पाहावयास मिळतो. संग्रहालयात भारत आणि परदेशातील पूर्व-ऐतिहासिक पासून समकालीन पर्यंतच्या सुमारे 70,000 हून अधिक विविध कलाकृतींचा संग्रह आहे. याशिवाय, संग्रहालयात नैसर्गिक इतिहास विभाग देखील आहे.



## **बाहुबली** (प्रतिकृती)

बाहुबली म्हणजे शब्दशः ‘शक्तिशाली हात’. हे जैन धर्मांचे पहिले तीर्थंकर ऋषभनाथ यांचे पुत्र. स्वतःचा भाऊ भरत याच्याशी झालेल्या भयंकर युध्दानंतर, पश्चातापाने दुःखी झालेले बाहुबली तपश्चर्या करण्यासाठी जंगलात दूरवर निघून गेले. ते त्यांच्या तपश्चर्येशी इतके एकनिष्ठ होते की, त्यांच्या सर्वांगावर लता वाढू लागल्या तरी त्यांनी आपले ध्यान भंग होऊ दिले नाही. त्यामुळेच त्यांना शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही शक्तींचे प्रतीक मानले जाते.



# दगडी हत्यारे

मानवी इतिहासाची सुरुवात दशलक्ष वर्षांपूर्वीपासूनची आहे. या काळात विपुल प्रमाणात सापडलेल्या वस्तूंपैकी एक म्हणजे दगडी हत्यारे. आजतागायत निर्माण झालेल्या तंत्रज्ञानाच्या सर्वात महत्त्वाच्या घटकांपैकी हे एक आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.  ही साधने बहुउद्देशीय असून मुख्यतः अन्न शिजवण्यासाठी आणि निवारा तयार करण्यासाठी वापरली गेली. दगडांची निवड आणि त्यांचा आकार ती कशासाठी वापरली गेली असावीत हे दर्शवितात.


**तुमच्या मते, आजच्या जगात  सगळ्यात महत्त्वाचे 'हत्यार ' कोणते आहे?**



## जेकोबिन कोकिळ

पक्ष्यांच्या कोकिळ कुटुंबातील (कोकिलाद्य) सदस्य जेकोबिन कोकिळ आफ्रिका आणि आशियामध्ये आढळून येतात. ते अंशतः स्थलांतरित पक्षी असून त्यांचे भारतात आगमन हे पावसाळ्याच्या प्रारंभाचे द्योतक आहे. त्यांच्या डोक्यावर एक विशिष्ट तुरा असतो आणि त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण "पीयू पीयू" अशा आवाजाद्वारे देखील त्यांना ओळखले जाऊ शकते. प्रस्तुत नमुना टॅक्सीडर्मीच्या प्रक्रियेतून गेला आहे ज्यामध्ये पक्षाच्या आतील मांस बाहेर काढून त्याची त्वचा स्वच्छ करणे, ती जतन करणे, त्यात कापूस भरून योग्य आकारात शिवणे आणि मांडणे अशा उपप्रक्रियांचा समावेश होतो.

**तुम्ही पाहिलेले काही पक्षी सांगा पाहू? तुम्ही त्यांच्या आवाजाची नक्कल करू शकता का?**



## भारतीय लघुचित्र – हत्ती

भारतीय चित्रांचे वर्णन करताना “लघुचित्र” हा शब्द प्रथम युरोपियन लोकांनी वापरला कारण त्यांची चित्रे आकाराने फार मोठी होती. भारतीय लघुचित्रांच्या अनेक शैली आहेत आणि हे चित्र बुंदी राजस्थानी शैलीचे आहे. त्यात उन्हाळा किंवा ज्येष्ठ महिन्याचे दर्शन होते. उष्णता वाढल्यावर आपल्याला जसे अस्वस्थ होते, तसेच चित्रातील हत्तींनाही उष्णता असह्य झाल्याचे दिसत आहे आणि त्यातील एक हत्ती पाण्याचा शोध घेताना दर्शविला आहे. राजस्थानच्या धगधगत्या उन्हाळ्याचे वातावरण तयार करण्यासाठी चित्रकाराने केशरी आणि पिवळ्या रंगाचा वापर केला आहे.



## **चाकांवरील पक्षी** (प्रतिकृती)

भूतकाळात लोक कसे जगले असतील हे समजून घेण्यासाठी पुरातत्त्वशास्त्रज्ञ कलाकृतींद्वारे इतिहासाची पुनर्रचना करतात. सुमारे 4500 वर्षे जुनी ही चाकांवरील पक्ष्याची मृण्मूर्ति मोहेंजो-दारो येथील उत्खननात सापडली. सिंधू संस्कृतीचे हे शहर जगातील काही सर्वात प्राचीन शहरांपैकी एक आहे. पक्ष्याच्या मूर्तीला जोडलेल्या चाकांवरून ते खेळण्यासारखे वापरले गेले असावे असे सूचित होते.



# कोल्हापुरी साज

**सोनार दागिने कसे बनवत असतील याचा तुम्ही कधी विचार केला आहे का?**

महाराष्ट्रातील दागिन्यांचे एक नाजूक आणि अस्सल उदाहरण म्हणून कोल्हापुरी साज युगानुयुगे लोकप्रिय आहे. हा अलंकार बनविण्याच्या तंत्रात साधारणतः सोन्याचे पत्रे दगडी किंवा पितळी साच्यात ठेऊन दाबले जातात व नक्षीदार बारकावे उठून दिसण्याकरिता हलक्या हाताने ठोकले जातात. नंतर त्याचा आकार टिकवून ठेवण्यासाठी पोकळ भाग लाखेने भरला जातो. साचाच्या या तंत्रामुळे सोनार कमी सोन्याचा वापर करून मोठ्या आकाराचे दागिने बनवू शकतो.



**चंद्रगुप्त दुसरे यांचे नाणे** (प्रतिकृती)

गुप्त वंशाने भारताच्या उत्तर, मध्य आणि पश्चिम भागावर इ. स. चौथ्या शतकाच्या सुरुवातीपासून ते सहाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत राज्य केले. गुप्तकालीन सोन्याची नाणी गुप्त शासकांच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातील विविध पैलू दर्शवितात. चंद्रगुप्त दुसरे यांनी जारी केलेल्या या नाण्याच्या एका बाजूला कमळावर आसनस्थ देवी लक्ष्मी दिसत आहे. गुप्त राजांच्या धार्मिक श्रद्धांबद्दल आपल्याला याद्वारे माहिती मिळते तर दुसऱ्या बाजूला सिंहाचा वध करत असलेल्या राजाला दाखवून त्यांचे शौर्य आणि वर्चस्व दिसून येते .

**जर तुम्हाला नाणे जारी करायची परवानगी मिळाली तर नाण्यावर तुम्हाला कोणती प्रतीके उमटवायला आवडतील?**



## वस्त्र

वस्त्र किंवा कापड हा आपल्या दैनंदिन जीवनाचा एक भाग आहे. वेशभूषा, बैठकीचे किंवा सजावटीचे लाकडी सामान जसे की सोफा, खुर्च्या बनवताना वस्त्राचा वापर करण्यात येतो. शाही किंवा लष्करी कार्यक्रमांमध्ये त्या त्या राज्याचे, राज्यकर्त्यांचे किंवा लष्कराच्या तुकडीचे प्रतीक दाखविण्यासाठी वस्त्राचा उपयोग केला जातो. देवाला अर्पण करण्यासाठी किंवा भेटवस्तू म्हणूनही वस्त्राचा वापर केलेला दिसून येतो. वेगवेगळ्या प्रदेशानुसार वस्त्राचे प्रकार बदलत जातात. वस्त्रे सहसा कापूस, लोकर, रेशीम अशा स्थानिक पातळीवर उपलब्ध तंतूंपासून विणली जातात आणि वैविध्यपूर्ण रंगकाम, सुईकाम, भरतकाम इत्यादी कलांचा वापर करून वस्त्रे बनविली जातात. पारंपारिक वस्त्र बनविताना अनेकदा त्यांच्या सभोवतालच्या निसर्गातील नक्षींपासून प्रेरणा घेऊन नक्षीकाम केले जाते. तुम्ही बरेचदा फुले, झाडे, पक्षी आणि प्राणी यांची नक्षी कपड्यांवर पहिली असेल.

**तुम्ही आज जे कपडे घालून आला आहात त्यावर तुम्हाला कोणती नक्षी दिसते आहे?**

# म्युझियम ऑन व्हील्स

“सिटी-सी. एस् . एम् . व्ही. एस्. म्युझियम ऑन व्हील्स” हा उपक्रम सहा वर्षांपासून कार्यरत आहे. हा उपक्रम दोन अत्याधुनिक बसेसद्वारे संग्रहालयाच्या शैक्षणिक प्रसाराच्या प्रयत्नांना पुढे घेऊन जातो. या दोन्ही बसेस महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक, शहरे, उपनगरे आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर प्रवास करतात. बसेसमध्ये विविध ऐतिहासिक, कलाविषयक, शास्त्रीय तसेच सामाजिक विषयांवरची मनोरंजक, माहितीपूर्ण व परस्पर संवाद साधणारी प्रदर्शने आहेत. प्रत्येक प्रदर्शनात संग्रहालयातील विशाल संग्रहित कलाकृतींच्या निवडक प्रतिकृती, त्यांच्याविषयीची संपूर्ण माहिती, इंटरॲक्टिव, डिजिटल व स्वतः करून पहावयाच्या ॲक्टिविटीज, ॲक्टिविटी शीटस् व माहिती पत्रके आहेत. व्हीलचेअर वापरकर्त्यांच्या प्रवेशासाठी इलेक्ट्रिक लिफ्टचीही बसमध्ये सोय करण्यात आली आहे.  सुरक्षेच्या उद्देशाने जागोगागी सीसीटीव्हीही बसवण्यात आले आहेत. संपूर्ण कार्यक्रम विनामूल्य आहे.

शाळा,  विद्यालये, सांस्कृतिक संस्था, संग्रहालये, ऐतिहासिक ठिकाणे, जत्रा,  गृहनिर्माण संकुले, आसपासची क्षेत्रे, मॉल आणि सरकारी विभाग संग्रहालयाची बस आपल्या ठिकाणी आमंत्रित करू शकतात. याद्वारे मुले, कुटुंबीय आणि  विविध समुदाय या उपक्रमाचा लाभ घेऊ शकतात.

बुकिंग चौकशीसाठी कृपया आम्हाला खालील ई-मेल वर संपर्क साधा.

**mow@csmvs.in**

आणि “म्युझियम ऑन व्हील्स” या उपक्रमाबद्दल अधिक माहिती मिळवण्यासाठी आमच्या वेबसाइटला भेट द्या - **csmvs.in**